# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक : 16.10.2026** **वार : शुक्रवार**

---

## ठळक बातम्या

1. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एस. टी. ची प्रस्तावित भाडेवाढ रद्द.
2. अन्न आणि औषध प्रशासनाकडून सुट्या मसाल्यांच्या विक्रीवर बंदी.
3. मतदार यादीत नाव नोंदणीसाठी राज्यात विशेष शिबिरं.
4. शाळा प्रवेशासाठी बालकांच्या किमान वयाचा एकच नियम; पुढच्या वर्षापासून टप्प्या-टप्प्यानं लागू होणार.
5. बाराव्या राष्ट्रीय इन्स्पायर–मानक स्पर्धेत राज्यातल्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी.

## सविस्तर बातम्या

**एसटी भाडेवाढ रद्द**

राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी भाड्यात सरसकट 15 टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव राज्य परिवहन महामंडळाने काल रद्द केला आहे. एस. टी. महामंडळाला आर्थिक तोटा सहन करावा लागत असला, तरी अशा कठीण काळात त्याची भरपाई सर्वसामान्य प्रवाशांकडून करणे योग्य ठरणार नाही अशी भूमिका घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. महामंडळाला होत असलेल्या आर्थिक तुटीचा भार थेट प्रवाश्यांवर टाकण्याऐवजी पर्यायी उपाययोजना करण्याच्या सूचनाही सरनाईक यांनी दिल्या.

**सुटे मसाले-नियमावली**

राज्य सरकारनं सुट्या मसाल्यांच्या विक्रीवर बंदी घातली आहे. अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी काल मुंबईत, वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. नवीन नियमांनुसार, मसाल्यांच्या पाकीटांवर, उत्पादनाचं नाव, त्यातले घटक पदार्थ, उत्पादकाचा तपशील, उत्पादनाची आणि पॅकिंगची तारीख, अंतिम मुदतीची तारीख असे सर्व तपशील ठळकपणे नमूद करणं बंधनकारक असणार आहे. मसाल्यांचं वजन वाढवण्यासाठी इतर पदार्थ जसे, खडूची पूड, लाकडाचा भुसा किंवा तत्सम पदार्थ मिसळायला बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय मसाल्यांमधे प्रतिबंधित रंग वापरण्यासही मनाई करण्यात आली आहे.

**मतदार यादी-विशेष मोहीम**

राज्यातील एकाही पात्र मतदाराचं नाव मतदार यादीत समाविष्ट होण्यापासून वंचित राहू नये, या उद्देशानं या 17, 18 तसंच 24 आणि 25 ऑक्टोबर रोजी राज्यातल्या सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचं आयोजन करण्यात आलं आहे. नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेऊन प्रारूप मतदार यादीतील आपले नाव तपासावं आणि आवश्यकतेनुसार नाव नोंदणी किंवा दुरुस्तीच्या अनुषंगानं 26 ऑक्टोबरपर्यंत विहित नमुन्यात ऑफलाइन किंवा ऑनलाइन पद्धतीनं अर्ज सादर करावेत असं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं केलं आहे.

**एकनाथ शिंदे**

शेतकाऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकार कुठेही हात आखडता घेणार नाही, शेतकऱ्यांची यंदाची दिवाळी काळी होऊ देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पुण्यात दिली. 32व्या पुणे नवरात्र महोत्सवात आयोजित महर्षी पुरस्कार वितरण

सोहळ्यात ते बोलत होते. ज्येष्ठ मंदिर स्थापत्य तज्ज्ञ डॉ. गो. ब. देगलूरकर, ज्येष्ठ पार्श्वगायिका उषा मंगेशकर आणि ज्येष्ठ गायक-संगीतकार श्रीधर फडके यांना यावेळी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'महर्षी' पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**कुंभमेळा-ध्वजस्तंभ**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, काल त्र्यंबकेश्वरमधील कुशावर्त तीर्थावर धार्मिक विधी आणि मंत्रोच्चाराच्या घोषात, धर्मध्वजाच्या ध्वजस्तंभाचं पूजन करण्यात आलं. नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते हा विधी पार पडला.

**'उडान'**

केंद्र सरकारच्या सुधारित 'उडान' योजनेअंतर्गत सोलापूर-मुंबई आणि अमरावती-पुणे या दोन मार्गांवर विमानसेवा सुरू करण्याचा प्रस्ताव असल्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल सांगितलं. या हवाई सेवांमुळे प्रवासाचा वेळ वाचण्याबरोबरच उद्योग, पर्यटन आणि रोजगाराच्या संधींना चालना मिळेल, असा विश्वास मोहोळ यांनी व्यक्त केला.

**'जनसेवा से देशसेवा' अभियान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सार्वजनिक क्षेत्रातील कारकिर्दीची 25 वर्षे पूर्ण करत आहेत. यानिमित्त सुरू असलेल्या विशेष वृत्तमालिकेत आज जाणून घेऊया 'जल जीवन अभियाना'विषयी...

***पाणी म्हणजे जीवन. पाण्याशिवाय संजीवांचं अस्तित्व व्यर्थ आहे. मात्र, 2019 पर्यन्त देशांतील कित्येक भागांतील, विशेषतः ग्रामीण भागातील कुटुंबं पाण्यापासून वंचित होती. ग्रामस्थांना पाण्यासाठी कित्येक मैल देखील वणवण करावी लागत होती. नेमकी हीच अडचण ओळखून, 'हर घर जल' अर्थात देशातील प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला घरगुती नळजोडणी देण्याच्या उद्दिष्टानं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारानं, जलशक्ती मंत्रालयाच्या अंतर्गत 'जल जीवन अभियान' सुरु करण्यात आले. हे अभियान सुरू होण्याच्या आधी देशभरात केवळ 3 कोटी 23 लाख म्हणजे सुमारे 16 टक्के ग्रामीण कुटुंबांकडे नळजोडणी होती. जून 2026 पर्यंत, हीच आकडेवारी सुमारे 16 कोटींहून जास्त म्हणजे 82% पेक्षा जास्त झाली. जलजीवन अभियान, केवळ जलवाहिन्या टाकण्यापुरते मर्यादित नसून, जलस्त्रोतांचं पुनर्भरण, पावसाचं पाणी साठवणं, सांडपाण्याचं व्यवस्थापन आणि संवर्धन यांची सांगड आहे. सुरुवातीला 2024 पर्यंत लक्ष्य असलेल्या अभियानाचा जलजीवन अभियानाचा दूसरा टप्प्यात विस्तार करण्यात आला असून, आता त्याचं उद्दिष्ट 2028 पर्यंत वाढविण्यात आलं आहे. जल जीवन अभियानामुळे, ग्रामीण भागातील महिलांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी वणवण थांबली असून, त्याचा त्यांच्या आरोग्यावर आणि सामाजिक सहभागावर सकरात्मक परिणाम दिसून येत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, पुण्याहून सविता म्हसकर.***

**शाळा प्रवेश**

राज्य शासनानं पूर्व-प्राथमिक ते इयत्ता पहिलीच्या शाळा प्रवेशासाठी बालकांचं किमान वय निश्चित केलं आहे. हे वय 30 जून रोजी पूर्ण असणं आवश्यक असून, नवे निकष शैक्षणिक वर्ष 2027-28 पासून टप्प्याटप्प्यानं लागू करण्यात येणार आहेत. शालेय शिक्षण विभागानं काल यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानुसार बालवाडी किंवा नर्सरीच्या प्रवेशासाठी तीन वर्षे पूर्ण असण्याचा निकष शैक्षणिक वर्ष 2027-28 पासून लागू होईल. छोटा गट किंवा ज्युनिअर के.जी.साठी चार वर्षे पूर्ण असण्याचा निकष 2028-29 पासून आणि मोठा गट किंवा सिनिअर के. जी. साठी 5 वर्षे पूर्ण असण्याचा निकष 2029-30 पासून, तर इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी सहा वर्षे पूर्ण असण्याचा निकष 2030-31 पासून लागू होईल. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020' मधील तरतुदींनुसार राज्य शासनाने हे वयाचे निकष निश्चित केले आहेत.

**इन्स्पायर-मानक स्पर्धा**

बाराव्या राष्ट्रीय इन्स्पायर-मानक प्रदर्शन आणि प्रकल्प स्पर्धेत राज्यातून सहभाग नोंदवलेल्या 35 विद्यार्थ्यांपैकी सात विद्यार्थ्यांनी 'सुपर 60' मध्ये स्थान मिळवून कौतुकास्पद कामगिरी केली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चांदगांव इथल्या न्यू इंग्लिश शाळेची विद्यार्थिनी श्रद्धा लोंढे हिने राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक पटकावलं आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी श्रद्धासह सर्व विद्यार्थ्यांचं अभिनंदन केलं आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांमधे पुण्यातील एम. ई. एस. राणी लक्ष्मीबाई मुलींच्या  सैनिकी शाळेची देविका ताड; सिटी प्राइड स्कूलचा अर्णव भुसारी; माधव सदाशिव गोलवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयाची गीता धनवडे यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांना केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत गौरवण्यात आलं.

या यशाबद्दल आकाशवाणीशी बोलताना पुण्यातील गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयाची गीता धनवडे म्हणाली...

***'Ergonomic Bicycle Seat for Enhanced Riding Comfort' हा नाविन्यपूर्ण विज्ञान प्रकल्प मी साकारला आहे. सायकल चालवताना अधिक आरामदायी अनुभव मिळावा, या उद्देशाने ही कल्पना सुचली. या प्रकल्पाच्या माध्यमातून दैनंदिन जीवनातील एका समस्येवर वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपाय शोधण्याचा मी प्रयत्न केला. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते झालेला गौरव हा खूप प्रेरणादायी होता. आनंददायी बाब म्हणजे सकुरा सायन्स कार्यक्रमांतर्गत जपानला भेट देण्याची संधी मिळणार आहे. भविष्यात विज्ञान क्षेत्रात संशोधन करून समाजाच्या उपयोगी पडणारे नाविन्यपूर्ण प्रकल्प तयार करण्याची माझी इच्छा आहे.***

**फटाके-बंदी**

नवरात्र तसंच आगामी दिवाळी आणि नाताळ या सणांसह वर्षभरातल्या सर्व सण-उत्सवांमधे, सार्वजनिक ठिकाणे, रस्ते आणि पदपथांवर फटाके वाजवायला मुंबई उच्च न्यायालयाने संपूर्ण बंदी घातली आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडापीठाने काल हा निर्णय दिला. मात्र, फटाक्यांचं उत्पादन आणि विक्रीवर बंदी घालण्यात आली नसल्याचं न्यायालयाने स्पष्ट केलं.

**अब्दुल कलाम जयंती**

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त काल त्यांना देशभरातून अभिवादन करण्यात आलं. यानिमित्त काल राज्यात 'वाचन प्रेरणा दिन'ही साजरा करण्यात आला. छत्रपती संभाजीनगरमध्ये, दुर्मिळ ग्रंथांचं प्रदर्शन भरवण्यात आलं होतं, तर सांगलीमध्ये सलग 12 तास वाचनाचा उपक्रम राबविण्यात आला.

**दुचाकी-अपघात**

जळगाव जिल्ह्यातील जामनेर-बोदवड रस्त्यावर वाडी फाट्याजवळ काल दुपारी मालमोटार आणि दुचाकीच्या अपघातात 6 जणांचा मृत्यू झाला. सर्व मृत मध्य प्रदेशातील रहिवासी आहेत.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातला पहिला टी-20 सामना आज रायपूरमध्ये होणार  आहे. सामना संध्याकाळी 7 वाजता सुरू होईल.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**